जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २५४ दिनांक - ०७/०६/२०२४**

येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर

# अज्ञात आरोपींचा शोध घेवून ५ गुन्हे उघडकीस आणून,६ आरोपी अटक करुन ३,३९,०००/- रु.किंमतीचा मुद्देमाल केला हस्तगत

येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना तपास पथकाचे अंमलदार यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,संभाजी चौक येरवडा येथे चोरी करणारे संशयीत आरोपी हे चित्रा चौक येरवडा पुणे येथे चोरी केलेले मोबाईल विक्रीसाठी उभे असल्याची माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथक अधिकारी पोलीस उप-निरीक्षक स्वप्निल पाटिल व स्टाफ यांनी तेथे जावून संशयीत इसमांना पळून जात असताना पकडले. त्यांना ताब्यात घेवून नाव पत्ता विचारता **१) साबीर अहमद खान वय २६ वर्षे रा येरवडा पुणे २) बालाजी मोहन मिसाळ वय २१ वर्षे रा येरवडा पुणे** असल्याचे सांगितले.त्यांचेकडे ताब्यातील मोबाईलबाबत चौकशी करता उडवाउडवीची उत्तरे देवू लागल्याने येरवडा पो.स्टे.अभिलेख पडताळून पाहिला असता त्याबाबत येरवडा पो.स्टे.गु.र.नं.१३७/२०२४ भादवि.३८० अन्वये गुन्हा दाखल असल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे.सदर आरोपींना अटक करुन गुन्हयातील चोरीस गेलेले १,६६,०००/- रु.किंमतीचे ४ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

तसेच येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना तपास पथकाचे पो.अंमलदार अनिल शिंदे,प्रशांत कांबळे,विठ्ठल घुले,नटराज सुतार,दत्तात्रय शिंदे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,कल्याणीनगर येथून गाडी चोरी करणारा संशयीत आरोपी हा उरुळी देवाची येथे आल्याची माहिती मिळताच सदरची माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथक अधिकारी पोलीस उप-निरीक्षक स्वप्निल पाटिल व पो.अंमलदार अनिल शिंदे,तुषार खराडे,प्रशांत कांबळे, दत्तात्रय शिंदे,नटराज सुतार,विठ्ठल घुले यांनी तेथे जावून संशयीत इसमांस पळून जात असताना पकडले. त्यांस ताब्यात घेवून नाव पत्ता विचारता **अनिकेत शंकर कसबे वय २३ वर्षे रा उरुळी देवाची पुणे असल्याचे सांगितले.सदरचा गुन्हा त्याने इतर २ साथीदार नामे ओंकार मच्छिंद्र पवार वय २४ वर्षे रा ताडीवाला रोड पुणे व सोहेल पिरसाहब शेख वय २२ वर्षे रा मांजरी पुणे** यांचेसमवेत केल्याने त्यांना येरवडा पो.स्टे.गु.र नं.१९६/२०२४ भादवि ३७९ मध्ये अटक करण्यात आली असून त्यांचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेली १५,०००/-रु.किंमतीची मोटारसायकल हस्तगत करण्यात आली आहे.सदर आरोपींकडून एकूण ३ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले असून एकूण १,७३,०००/- रु.किंमतीचा गुन्हयात चोरीस गेलेल्या ३ मोटार सायकल व गुन्हयात वापरलेल्या २ मोटार सायकल अशा एकूण ५ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.

तसेच येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना तपास पथकाचे पो.अंमलदार कैलास डुकरे व अनिल शिंदे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,येरवडा पो.स्टे.गु.र.नं. २०४/२०२४ भादवि ३८७,३४१ मधील आरोपी रुतिक सारगे येरवडा पो.स्टे.हद्दीत आल्याची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथक अधिकारी पोलीस उप-निरीक्षक स्वप्निल पाटिल व पो. अंमलदार कैलास डुकरे व अनिल शिंदे यांनी तेथे जावून संशयीत इसमांना पळून जात असताना पकडले. त्यांस ताब्यात घेवून नाव पत्ता विचारता **रुतिक दत्ता सारगे वय २१ वर्षे रा आंबेडकर चौक येरवडा पुणे** असल्याचे सांगितले.त्याचेकडे चौकशी करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.सदर गुन्हयात आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.विजयकुमार मगर, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्रीमती आरती बनसोडे, वपोनि येरवडा पो.स्टे.श्री.संतोष पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि स्वप्निल पाटील,श्रेणी पोउपनि प्रदिप सुर्वे, पो.अंमलदार गणपत थिकोळे,दत्ता शिंदे,तुषार खराडे, किरण घुटे,कैलास डुकरे,सागर जगदाळे,अनिल शिंदे,सुरज ओंबासे,दत्तात्रय शिंदे,प्रशांत कांबळे,सुशांत भोसले,विठ्ठल घुले,नटराज सुतार यांनी केलेली आहे.